# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.12.2024** **वार – शुक्रवार**

---

**प्रत्यक्षकर**

करदात्यांमध्ये जागरूकतेच्या अभावामुळे परदेशी मालमत्ता आणि उत्पन्न न घोषित केल्यामुळे अनेक करदात्यांना दंड आणि कारवाईला सामोरे जावे लागते, असे प्रतिपादन प्रधान मुख्य प्राप्तिकर आयुक्त आणि महासंचालक सतीश शर्मा यांनी केले. प्राप्तिकर विभागाच्या अन्वेषण संचालनालय आणि पुण्यातील दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या शाखेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी ते आज पुण्यात बोलत होते. करदात्यांनी स्वेच्छेने आपल्या मालमत्तेची घोषणा करून दंडात्मक कारवाई टाळावी आणि आपल्या देशाच्या आर्थिक अखंडतेमध्ये योगदान द्यावे, असे आवाहनही शर्मा यांनी केले.

**बालरंगभूमी**

पुण्यातील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात आजपासून पहिल्या बालरंगभूमी संमेलनाची सुरुवात झाली. शोभायात्रेने या संमेलनाचा प्रारंभ झाला. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा निलीम शिर्के-सामंत यांच्यासह अनेक मान्यवर आणि बालप्रेक्षकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने हजेरी लावली. संमेलनाध्यक्ष नटवर्य मोहन जोशी यांच्या हस्ते संमेलन प्रवेशद्वाराचे औपचारिक उदघाटन करण्यात आले. बालरंगभूमी परिषदेचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन**

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आज पहिल्या शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनानिमित्त साहित्य-कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन समिती पुणे महानगरपालिका आणि पुण्यातील संवाद यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन भरवण्यात आलं आहे. 22 डिसेंबरपर्यंत हे संमेलन सुरू राहणार आहे. अधिकाऱ्यांनी लिहिलेली पुस्तके, छायाचित्रे, चित्रे, जुनी नाणी आणि नोटा, काष्ठशिल्पे तसेच खडूवर साकारलेली शिल्पे प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. यावेळी यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, संवाद पुणेचे सुनील महाजन आदि उपस्थित होते. साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा उद्या पार पडणार आहे.

**विजयस्तंभत**

कोरेगाव भीमा विजयस्तंभ शौर्यदिन अभिवादन सोहळ्यासाठी पायाभूत सुविधा आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी विजयस्तंभ येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे सल्लागार आणि माजी उपमहापौर सिद्धार्थ धेंडे, समिती अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्यासह इतर मान्यवर यामध्ये सहभागी झाले होते.

**परिवहन**

विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांकडून नियमांचे उल्लंघन केले जात असल्याने पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या दीड हजार वाहनांची तपासणी करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. शाळांचे प्रतिनिधी, वाहनचालक आणि वाहनातील मदतनीस यांना प्रशिक्षण देण्याबाबत कुठलीच कार्यवाही केली जात नसल्याने कारवाई करण्याची मागणी पुणे पालक संघटनेच्या अध्यक्ष जयश्री देशपांडे यांनी केली आहे.

**<u>मिलेट जत्रा</u>**

पुण्यातील कृषी विभाग आणि रोटरी कॅम्प डिस्ट्रिक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'रोटरी मिलेट जत्रा 24' चे आयोजन येत्या 24 डिसेंबर रोजी कोथरूड इथल्या गांधीभवन इथं करण्यात आलं असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली आहे. भरड धान्य उत्पादक शेतकरी, उपपदार्थ उत्पादक आणि ग्राहक यांना एकत्रित व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या एक दिवसीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>येरवडा</u>**

येरवडा तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेचं आधुनिकीकरण करण्यात आलं असून मध्यवर्ती कारागृहात अद्ययावत यंत्रणा बसविण्यात आली आहे. गुरुग्राम येथील इन्वडेर टेक्नॉलॉजी या संस्थेतर्फे ही प्रणाली बसवण्यात आली आहे. कारागृह विभागाचे विशेष महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्या हस्ते प्रणालीच उद्घाटन करण्यात आलं.

**<u>गावे मनपा</u>**

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमधील सुविधा क्षेत्राच्या जागा ताब्यात आलेल्या आहेत त्यापैकी 20 जागा पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी निश्चित केल्या आहेत. महापालिकेत 2017 मध्ये 11 गावे आणि 2021 मध्ये 23 गावे समाविष्ट झाली. त्यातील उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावे वगळण्यात आली असून, सध्या 32 गावे महापालिकेत समाविष्ट आहेत.

**<u>नवीन मराठी शाळा</u>**

पुण्यातील नवीन मराठी शाळेत आज 'वंदे मातरम' या गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्यलढ्याची यशोगाथा सांगणाऱ्या कार्यक्रमाचं आयोजन आज करण्यात आलं आहे. मुख्याध्यापिका कल्पना वाघ यांनी दिली.

**<u>महावितरण</u>**

महावितरणच्या 'महापॉवर-पे' पेमेंट वॉलेटला पुणे विभागात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या सहा महिन्यांत 16 लाख 6 हजार 662 वीजग्राहकांनी 177 कोटी 42 लाख रुपयांच्या वीजबिलांचा वॉलेटद्वारे भरणा केला आहे. तर कमिशनपोटी वॉलेटधारकांनाही 80 लाख 33 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

**<u>अपघात</u>**

ताम्हाणी घाटाजवळ एका धोकादायक वळणावर बस दरीत कोसळून आज सकाळी झालेल्या आपघतात पाच जणांचा मृत्यू झाला तर 12 ते 13 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. चाकण येथून महाडला जात असताना बसला हा अपघात घडला. बसमध्ये 40 च्या आसपास प्रवासी असल्याची माहिती आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान 32 तर किमान तापमान 12 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच हवामाव राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**